# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.09.2025** **वारःगुरुवार**

---

1. जीएसटी दराच्या सुसुत्रीकरणाला मान्यता, 12 आणि 28 टक्क्यांचा टप्पा रद्द
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी सिंगापूरच्या पंतप्रधानांची भेट घेऊन बहुउद्देशी सहकार्याचा घेणार आढावा
3. वाढीव कर धोरणाबाबत डोनल्ड ट्रम्प यांच्यावर, अमेरिकेच्या विश्लेषकांची टीका
4. पंजाबमध्ये पूरपरिस्थिती गंभीर, केंद्रीय कृषी मंत्र्यांचा आज पंजाब दौरा आणि
5. आशिया हॉकी स्पर्धेच्या सुपर-फोरमध्ये भारताचा आज मलेशियासोबत सामना

**<u>जीएसटी सुसुत्रीकरण</u>**

वस्तू आणि सेवा करातील प्रस्तावित दर सुसुत्रीकरणाला काल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या 56व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सामान्य नागरिक, कामगार केंद्रीत उद्योग, शेतकरी, शेती, आरोग्य आणि अर्थव्यवस्थेच्या प्रमुख भागीदार लक्ष्य करताना, जीएसटी दरामध्ये बदल केले आहेत. सर्वसामान्य माणसांच्या आणि मध्यमवर्गीय लोकांच्या वापराच्या वस्तूंवरील वस्तू आणि सेवा कर 18 टक्के किंवा 12 टक्क्यांवरून पाच टक्के करण्यात आला आहे. वैयक्तिक विमा, सावधी विमा, युलीप अथवा एन्डोवमेंट पॉलिसी, कौटुंबिक, ज्येष्ठ नागरिकांचा विमा तसंच पुनर्विमा यांसह सर्व वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी यांना वस्तू आणि सेवा करातून सवलत देण्यात आली आहे.

22 सप्टेंबरपासून हे बदल लागू होणार असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल रात्री उशीरा बैठकीनंतर दिली. सामान्य माणसाला परवडणारा विमा मिळणे आणि विम्याची व्याप्ती वाढवण्याचा उद्देश यामागे असल्याचं सीतारामन यांनी स्पष्ट केलं. जीएसटी बदलामध्ये 33 जीवनरक्षक औषधांवरील कर 12 टक्क्यांवरून शून्य तर कर्करोग, दुर्मिळ आजार आणि इतर गंभीर आजारांवर वापरल्या जाणाऱ्या तीन जीवरक्षक औषधांवरील जीएसटी 5 टक्क्यांवरून शून्य करण्याची घोषणा केली आहे. इतर सर्व औषधांवरील कर 12 टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी  करण्यात आला आहे. तर वैद्यकीय शस्त्रक्रिया, दंतोपचार, पशुवैद्यकीय हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय उपकरणे आणि साधनं यांवरील करात 18 टक्क्यांवरून 5 टक्क्यांपर्यंत घट करण्यात आली आहे.

त्याशिवाय सर्वसाधारण घरगुती वापराच्या वस्तूंवर जसे केसतेल, साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश, सायकल, स्वयंपाकाची भांडी, आदींवर पाच टक्के जीएसटी असेल. तसंच अति-उच्च तापमानाचं दूध, पनीर, सर्व प्रकारचे भारतीय ब्रेड करमुक्त असतील. सामान्य मध्यमवर्गाला दिलासा देणारे अन्य महत्त्वपूर्ण निर्णय देखील कालच्या बैठकीत घेण्यात आले. त्यानुसार वातानुकुलित यंत्र, दूरचित्रवाणी संच, डिशवॉशर, लहान चारचाकी, मोटारसायकल यांच्यावरील 28 टक्क्यांचा जीएसटी कमी करून तो 18 टक्के करण्यात आला. अप्रत्यक्ष कर रचनेत सुधारणा करताना, जीएसटी परिषदेने 12 टक्के आणि 28 टक्के दर रद्द करून, 5 टक्के आणि 18 टक्के दर कायम ठेवून, सध्याचे चार टप्पे कमी करून दोनवर आणले. या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरींसह काही राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तर इतर राज्यांचे अर्थमंत्री उपस्थित होते.

**<u>पीएम-मुरूगन-जीएसटी</u>**

पंतप्रधानांनी जीएसटीच्या नव्या सुधारणांचं स्वागत केलं आहे. समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, जीएसटीचे दर कमी करण्याचा सरकारचा निर्णय हा सामान्यांच्या हितासाठी घेतला आहे, त्याचा लाभ सामान्य नागरीक, शेतकरी, सूक्ष्म,

लघुउद्योग, मध्यमवर्गीय नागरिक, महिला आणि तरूणांना होणार आहे. जीवनमान सुलभ करण्याच्या दृष्टीने जीएसटी दर सुसुत्रीकरण आणि सुधारणा केल्या असून, यामुळे लहान व्यापारी आणि व्यवसायिकांना व्यवसाय सुलभता सुनिश्चित होईल असे त्यांनी संदेशात म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जीएसटी दर कपात हा एक ऐतिहासिक निर्णय असल्याचे समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटले आहे. यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय, शेतकरी, एमएसएमई, महिला आणि तरुणांना मोठा दिलासा मिळेल.

**पीएम-सिंगापूर**

पंतप्रधान मोदी आज नवी दिल्ली इथं सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांची भेट घेऊन दोन्ही देशांमधील भक्कम आणि बहुउद्देशी सहकार्याचा आढावा घेतील. दोन्ही पंतप्रधान परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही चर्चा करतील. पंतप्रधान वोंग यांचा हा दौरा भारत-सिंगापूर राजकीय संबंधांच्या 60 व्या वर्धापन दिनानिमित्त आहे आणि ही भागीदारी आणखी भक्कम करण्यासाठी दोन्ही देशांच्या निरंतर वचनबद्धतेची पुष्टी करणारा आहे असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. सिंगापूर हा भारतासाठी एक महत्त्वाचा भागीदार आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये पंतप्रधान मोदींच्या सिंगापूर भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध व्यापक धोरणात्मक भागीदारीपर्यंत पोहोचले होते.

**अमेरिका-व्यापार**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी भारतासोबतच्या व्यापारी संबंधांवर काल पुन्हा टीका केल्यानंतर, अशा टिकेमुळं अमेरिकेलाच फटका बसत असल्याचं तिथल्या प्रसार माध्यमांनी म्हटलं आहे. विश्लेषक कॅरोल रायन यांनी दावा केला की या शुल्कामुळं आरंभी भारतीय खरेदीदार घाबरले आणि त्यांनी मध्यपूर्वेला तेल खरेदीच्या ऑर्डर्स दिल्या. परंतु रशियानं भारतीय खरेदीदारांना पुन्हा आपल्याकडं वळवण्यासाठी तेलाच्या किंमती कमी केल्या. त्यामुळं भारतानं ही खरेदी चालू ठेवायला परवानगी दिली आणि तेल पुरवठा सुरळीत राहिला. कॉन्झर्वेटिव समीक्षक बेन शापिरो यांनी भारतावर 50 टक्के कर लादण्याबाबत दावा केला की, अमेरिकेसाठी भारतासोबतचे व्यापार संबंध व्यापक दृष्टीने महत्वाचे तर आहेतच, शिवाय भारताचं भू-राजकीय महत्वं कमी लेखून चालणार नाही. द इकॉनॉमिस्ट या मासिकानं प्रकाशित केलेल्या लेखात चीनमधील शांघाय सहकार्य बैठक आणि त्यानंतर लष्करी संचलन म्हणजे शी जिनपिंग यांचा अमेरिका-विरोधी सोहळा होता असं म्हटलं आहे. या परिषदेत मोदी यांची उपस्थिती अतिशय लक्षणीय होती आणि भारत अमेरिका सोडून चीनकडे जात असल्याचं त्यातून सूचित झालं असं या लेखात म्हटलं आहे.

**अंगणवाडी-शाळा सहस्थान**

अंगणवाडी केंद्र शाळांच्या ठिकाणी असावी याविषयी काही मार्गदर्शक तत्वे दिल्लीत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी काल जारी केली. यामुळे आई-मुलाची संपूर्ण काळजी सुनिश्चित होईलच शिवाय राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020च्या अनुषंगाने शिक्षणाचा पाया भक्कम होईल असं प्रधान यांनी नमूद केलं. मुलांच्या आयुष्यात अंगणवाडी कर्मचारी पहिल्या शिक्षकाची महत्त्वाची भूमिका निभावत असल्याचं सांगून, भारतीय भाषा शिकवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर त्यांनी भर दिला.

**बिहार बंद-एनडीए**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींबद्दल केलेल्या अपमानास्पद वक्तव्याच्या निषेधार्थ एनडीएनं आज बिहार बंदची हाक दिली आहे. दरभंगा इथं काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या मतदार अधिकार यात्रेदरम्यान पंतप्रधान आणि त्यांच्या मातोश्रींविरुद्ध व्यासपीठावरून आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात आली असा आरोप भाजपाचे प्रदेशाध्यक्ष डॉक्टर दिलीप जयस्वाल यांनी केला आहे.

**केरळ-ओणम**

केरळमध्ये उद्या थिरु ओणम साजरा करण्यासाठी तयारी पूर्ण झाली आहे. परंपरेनुसार, उथ्रादा पचिल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेवटच्या पर्वात खरेदीचा उत्साह शिगेला पोहोचतो. राज्यभरात हजारो सांस्कृतिक कार्यक्रम आणि खरेदी मेळे यांची आज रेलचेल राहील.

**पंजाब-पूर**

पंजाबमध्ये संततधार पावसामुळे बियास, सतलज, रावी आणि घग्गर नद्यांच्या पाणीपातळीत सातत्याने वाढ होत आहे. भाखरा, पोंग आणि रणजित सागर धरणांमधून होत असलेल्या नियंत्रित विसर्गामुळे सीमावर्ती भागातल्या जिल्ह्यांना अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. या पुरामुळे पंजाबच्या 23 जिल्ह्यातील साडेसोळाशे गावे प्रभावित झाली आहेत तर पावणेदोन लाख एकरपेक्षा अधिक शेती पाण्याखाली गेल्याने भात आणि इतर पिकांचं नुकसान झालं आहे. सर्व प्रकारचे बचाव आणि मदत कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. चंदीगडच्या हवामान खात्याने आजपासून 8 तारखेपर्यंत पंजाबमध्ये पाऊसमान घटण्याचा अंदाज वर्तवला आहे.

**शिवराज सिंग-पंजाब**

दरम्यान, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान आज पंजाबच्या पूरग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत. पूरग्रस्त अमृतसर, गुरदासपूर आणि कपूरथला भागातल्या बाधित भागाला भेट देणार आहेत. त्यानंतर राज्य आणि केंद्र सरकारच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत उच्च स्तरीय बैठक घेण्याची शक्यता असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**छत्तीसगड-माओवादी**

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यातल्या 20 माओवाद्यांनी काल शरणागती पत्करली. यामध्ये 9 महिलांचा समावेश आहे. या सर्वांवर 33 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं.

**नागपूर आयुध**

नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील बाजारगाव कोंढाळी इथल्या सोलार एक्स्प्लोजिव या शस्त्रास्त्र निर्मिती करणाऱ्या कंपनीत मध्यरात्री स्फोट होऊन रात्रपाळीतल्या एका कामगाराचा मृत्यू झाला तर 15 जण जखमी झाले आहेत. ही भारतीय आयुध निर्माणीची एक पुरवठादार कंपनी आहे. जखमींना नागपूरला नेण्यात आलं आहे.

**आशिया कप**

बिहारमध्ये सुरू असलेल्या पुरूष आशिया हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत, सुपर चार गटातल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय संघाचा सामना आज बलाढ्य मलेशियाच्या संघाशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना खेळला जाईल. तर गटातल्या दुसऱ्या सामन्यात चीन आणि कोरिया संघ आमनेसामने असतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.